कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

टोल फ्रि क्रमांक १०६४

कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

:: प्रेस नोट :: दिनांक :- १९.०७.२०१९

**भुमिअभिलेख कार्यालय घनसावंगी, जि.जालना येथील अभिलेखापाल श्री.आकाश साळवे यांनी 100/- रुपयाचे लाचेची मागणी केल्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री.आकाश नाना साळवे,अभिलेखापाल,भुमी अभिलेख कार्यालय घनसावंगी जि. जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.०३.०७.२०१९ रोजी ,भुमी अभिलेख कार्यालय घनसावंगी जि.जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.व्हि.एल.चव्हाण, पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, तक्रारदार यांना बँकेकडून पिक कर्ज घेण्यासाठी शेतजमीनीची नकल ची आवश्यकता होती म्हणुन तक्रारदार यांनी काही दिवसापुर्वी भुमी अभिलेख कार्यालय घनसावंगी येथे जावुन सर्वे नं. ७९ शेतजमीनीची नक्कल मिळणे करिता अर्ज केला होता. त्यानंतर दि. ०३/०७/२०१९ रोजी तक्रारदार हे भुमी अभिलेख कार्यालय घनसावंगी येथे जावुन तेथील नक्कल देणारे अकाश साळवे यांना भेटून नक्कल देण्याची विनंती केली असता सदर शेतीची नक्कल देण्यासाठी श्री.आकाश साळवे,अभिलेखापाल, यांनी तक्रारदार यांच्याकडे २५०/- रुपये लाचेची मागणी करुन २५०/- रुपये दिल्याशिवाय नक्कल मिळणार नाही असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०३.०७.२०१९ रोजी श्री.आकाश साळवे.अभिलेखापाल यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी भुमिअभिलेख कार्यालय,घनसावंगी येथे जावून केली असता लाच मागणी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष श्री.आकाश साळवे.अभिलेखापाल यांनी तक्रारदार यांचे कडे शेत जमीनीची नक्कल देण्यासाठी तडजोडअंती १००/- रुपये लाचेची मागणी करुन १००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारणार असुन लाचेची रक्कम भुमिअभिलेख कार्यालय,घनसावंगी येथे आणून देण्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन वरील आरोपी विरुध्द पोलीस ठाणे घनसावंगी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक डॉ.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस उप अधिक्षक श्री.रविंद्र डी.निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली, पो.नि.श्री.व्हि.एल.चव्हाण, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे जालना कार्यालयाचे कर्मचारी यांनी पार पाडली.

**तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.७९७२७२६१०१ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना